निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२३/अपील/०५/२०२३/०२८० दिनांक-१४.०६.२०२३

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :२०.०३.२०२३
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:१८.०४.२०२३
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :२७.०४.२०२३
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :१४.०६.२०२३

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०५/२०२३</u>**

**अपीलकर्ता:** श्री. बाळू लहू उगले

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०३.२०२३ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २६.०४.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २७.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २७.०४.२०२३ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०८.०५.२०२३ रोजी आयोजीत केली होती परंतू, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०५.२०२३ रोजी ई-मेलद्वारे वैद्यकिय अडचण असल्यामुळे सदर सुनावणीस हजर राहणे शक्य नसल्याने सुनावणी पुढे ढकण्यात येवून नवीन तारीख देण्याची विनंती केली होती, त्यानुषंगाने सदर सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन:श्च

सुनावणीस दिनांक ११.०५.२०२३ (गुरूवार) रोजी आयोजीत करण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

i. माझे जवळ जवळ सात महिन्यापूर्वीच्या दिनांक २२ जुलै, २०२२ रोजीच्या ईमेल च्या अनुषंगाने मागितलेली ACR ची प्रत /माहिती, त्यासंदर्भात संबंधित उप-संचालक व अवर सचिव यांच्याकडून झालेली दिरंगाईची कारणे, त्यावर झालेली कारवाई याबाबत व इतर सर्व माहिती आणि कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.

ii. मा. आयोगाच्या प्रशासन आणि वित्त अशा दोन्ही विभागातील कामातील चालढकल, दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दफ्तर दिरंगाई कायद्यानुसार किंवा इतर नियमाप्रमाणे आजतागायत काय कारवाई केली आहे? याबाबतची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

iii. मा. आयोगाच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीने नियुक्ती दिलेल्या सर्व तांत्रिक व प्रशासन विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची माहिती जसे कि, अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना प्रशासन विभागाने घेतलेली परिक्षा, मुलाखती इ. ची माहिती देण्यात यावी. जर अशा मार्गाने नियुक्ती झाली नसेल तर इतर कोणत्या मार्गाने नियुक्ती केली आहे? याची माहिती देण्यात यावी. याशिवाय अशा सर्व अधिकारी यांची नावे, त्यांचा मूळ विभाग, प्रतिनियुक्तीचा कालावधी, त्यांचा प्रतिनियुक्तीचा वाढविण्यात आलेला कालावधी, त्यासंदर्भातील प्रशासन विभागाच्या सादर केलेल्या नस्ती / फाईल, मा. आयोगाची मंजुरी याबाबतची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

iv. गेल्या पाच वर्षात किंवा त्याआधि मा. आयोगाच्या कार्यालयात तांत्रिक विभागातील अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांची Irregular नेमणूक आणि DPC न करता Irregular पदोन्नती झाली आहे काय? याबाबतच्या सर्व तांत्रिक अधिकारी वर्गाच्या मंजूर नस्ती, फाईल इ. च्या साक्षांकित प्रती उपलब्ध करून देणे. याबाबत शासनाच्या (केंद्र सरकार / राज्य सरकार) कोणत्याही संस्थेने काही आक्षेप नोंदविले आहेत काय? याबाबतचा तपशील व माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. याशिवाय मा. आयोगाच्या कार्यालयात तांत्रिक आणि प्रशासन विभागाच्या कोणत्या अधिकारी किंवा कर्मचारी याला excess payment किंवा भत्ते दिले गेले आहेत काय? याबाबत शासनाच्या (केंद्र सरकार / राज्य सरकार) कोणत्याही संस्थेने काही आक्षेप नोंदविले आहेत काय? याबाबतचा तपशील व माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

माहिती अधिकार अर्ज दिनांक २०.०३.२०२३ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

**<u>वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर</u> :-**

*ACR चे कामकाज प्रगतीपथावर आहे.*

**<u>वरिल मुद्दा क्रमांक (ii) ला दिलेले उत्तर</u> :-**

*The information has sought, kindly refer the Govt of Maharashtra notification no. संकीर्ण २०१२/८९/प्र.क्र.४७ /सहा, दि.१७.१०.२०१४.*

*"The CIC and the Courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure / punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section 8 (1) of RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the discloser of which would cause unwarranted invasion of privacy of that individual".*

**<u>वरिल मुद्दा क्रमांक (iii) (iv) ला दिलेले उत्तर</u> :-**

*आपण विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही.*

**<u>वरिल मुद्दा क्रमांक (iv) ला दिलेले उत्तर</u> :-**

*Information asked in question format. The Act does not permit raising imaginary questions and expecting the PIO to find answers for them.*

*A Public Information Officer (PIO) is not expected to provide intangible such as interpretations, opinions, advices, explanations, reasons as they cannot be said to be included in the definition of information in Section 2(f) of the RTI Act, 2005.*

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

*माहिती असमाधानकारक आहे. तसेच माहिती अपुरी असून मुद्देसूद नाही. कागदपत्रे सांक्षांकीत केलेली नाहीत.*

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>**

मुद्दा क्र. १ मध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या ई-मेलच्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली व संबंधित अधिकारी यांच्यावर काय कारवाई झाली व त्याची कारणे, उपलब्ध करून देणे हे माहिती अधिकारी यांचे कार्यकक्षेत येत नाही, ते फक्त या कर्यालयीन आस्थापनेवरील दस्तऐवज/ माहिती उपलब्ध करून देवू शकतात.

करीता माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर/उपलब्ध करून दिलेल्या माहितीमध्ये हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

तसेच अपिलार्थी यांचा मुद्दा क्र. २ सुध्दा कारवाईच्या अनुषंगाने असल्यास त्याला माहिती अधिकारी यांनी उत्तर देणे अपेक्षित नाही. करीता सदरहू माहितीस हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. ३ ची मागीतलेल्या माहिती मध्ये, अपिलार्थी यांनी नेमकी पाहिजे असलेल्या माहितीचा बोध होत नाही, स्पष्टता नाही. करीता माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती/उत्तरास हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

तथापी, माहिती अधिकारी यांनी ते स्पष्ट नमूद करणे गरजेचे होते, तसेच जी माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम क (१)(त्र) अंतर्गत येते ते नमूद करून त्यांची कारणे देणे गरजेचे होते, तसे येथे नमूद करून सदहू मुद्दा क्र. ३ मधील माहितीस हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

अपिलार्थी यांचा मुद्दा क्र. ४ यांस माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर/आदेश याला हस्तक्षेप करण्याची गरज नाही, अपिलार्थी यांनी त्यांना पाहिजे असलेली दस्तऐवज/कागदपत्रे अचूकपणे नमूद केलेली नाहीत.

वरील माहितीअधिकाराच्या अनुषंगाने मा.केंद्रीय माहिती आयोग यांची निर्णयाचे काही संदर्भ या अपिलाच्या अनुषंगाने संदर्भासाठी देण्यात येत आहेत:

In the matter of Mrs. Bina Saha vs. CPIO, Securities and Exchange Board of India (Decision dated November 6, 2012), the Hon'ble CIC held that: *"It must be remembered that Section 2(f) of the RTI Act defines information as a material or virtual record. The citizen has every right to get copies of such records held by any public authority including the SEBI. However, in order to get the copies of such records, the information seeker has to specify the details of the records she wants. In fact, section 6(1) of the RTI Act very clearly states that the information seeker has to specify the particulars of the information sought by him or her".*

The Hon'ble CIC in the matter of *Shri.P.Shivkumarn and Shri.K.Vijayakumaran Vs. CPIO, Baharat Sanchar Nigam Ltd. (Decision dated 13.06.2007), held that: "information seeker should asked for information, which may be available 'in any material form' as per section (2) of the Act. A CPIO is not expected to formulate his*

*response to various forms of queries and express his views on the issues raised by appellants. The information should be provided in the form in which it exists with the public authority."*

The Hon'ble CIC in the matter of *Shri Madan lal Aswal and Dal Chand Vs. CPIO Municipal Corporation Delhi (Decision dated 05.11.2008) held that "The respondent has replied to the query about the ownership of the land and the responsibility of maintenance …………. The appellant now wants to know why action of demolition has not been taken, before allotment which according to him was precondition. Though the respondents are well intentioned, reasons for actions or inaction of public authorities cannot be obtained unless they have been recorded by the public authority. The PIO cannot be expected to provide reasons unless they are recorded."*

करीता वरिल कारणमिमांसेवरून अपिल खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

**अपील खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.**

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. बाळू लहू उगले,
८०५, ओशिनिया 'ब' कासा रिओ,
लोढा पलावा, कल्याण शील रोड,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण,
जि.ठोणे- ४२१२०४.
मो.नं. ९८२००४३४१७

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**